प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक ३१/२०१७ | दिनांक १८/०४/२०१७ | कालावधी ५ दिवस

| डॉ. उत्तम महाडकर, | डॉ. ज्ञानेश्वर जगताप, | प्रा. विरेश चव्हाण, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२७९११९८ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |

| मागील हवामान सारांश दि. १५/०४/२०१७ ते १८/०४/२०१७ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

हवामान पूर्वानुमान (१९/०४/२०१७ सकाळी ८:३० पासून २३/०४/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)

| हवामानांचे घटक | : | १९/०४ | २०/०४ | २१/०४ | २२/०४ | २३/०४ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३५ | ३५ | ३६ | ३६ | ३४ |
| किमान तापमान (अं.से) | : | २५ | २५ | २४ | २४ | २४ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ० | ० | १ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ६६ | ६८ | ७५ | ७८ | ८० |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ३२ | ३३ | ४१ | ५१ | ५५ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०१५ | ०१२ | ०१० | ००९ | ००५ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक १९ ते २३ एप्रिल, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ५ ते १५ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा, काजू | फळधारणा | • फळधारणा झालेल्या आंबा झाडास उपलब्धतेनुसार शक्य आहे तिथे प्रति झाडास १० दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी द्यावे.<br>• आंबा फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक फळमाशी सापळे लावावेत.<br>• आंब्यामध्ये मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर झेल्याच्या सहाय्यान ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारशीनुसार बुरशीनाशकाची व इथीलीनीची प्रक्रिया देऊन पीकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतूक रात्रीच्यावेळी करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारू नये.<br>• तांबडे कोळी किडीच्या प्रादुर्भावामुळे पानगळ होत असल्यास डायकोफॉल १८.५ टक्के १० मिली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पानांच्या दोन्ही बाजूने फवारणी करावी.<br>• काजू झाडावरील रोठा या किडीच्या नियंत्रणासाठी रोठयाच्या अळया १५ मि. मी. आकाराच्या पटाशीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात व क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) १० मि. लि. प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग त्या द्रावणाने चांगला भिजवावा व उरलेले द्रावण झाडाच्या बुंध्यालगत मुळाशी ओतावे.<br>• काजू बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती उन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी.<br>• विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करावेत. |
| नारळ/ सुपारी | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस. २० मिली पाणी नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | • वांगी, मिरची, कोबी, नवलकोल इ. पिकांवर मावा, तुडतुडे, फुलकीडी यांचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅलेथिऑन (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट (१२ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात) मिसळून फवारावे.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक सापळे लावावेत. |
| कलिंगड | – | • कलिंगड पिकाची काढणी सुरू करावी, कलिंगडाची तयार फळे ओळखण्यासाठी फळाच्या देठाजवळील वेलतंतु सुकलेला असावा व कलिंगडाच्या जातीचा तयार होण्याचा कालावधी पुर्ण झालेला असावा, तसेच फळावर टिचकी मारली असता "दबदब" आवाज यावा.<br>• वेलवर्गीय भाजीपाला व कलिंगड पिकांच्या क्षेत्रामध्ये फळमाशीच्या नियंत्राणासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले रक्षक सापळे ४ नग प्रती हेक्टरी लावावेत. |
| दुभती जनावरे /शेळया | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• बहुवर्षीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकांची उदा. पॅराग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करावी. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |